# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१७/०५/२०१८
## दि.१६/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १७१/१८,भादविक ३९९,४०२,३३२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | लक्ष्मण बांगर,सहा.पो.फौज. खडकी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.शहाबाज सिराज कुरेशीवय-२२,रा.मेन्टल कॉर्नर,पंचशिलनगर,विश्रांतवाडी,पुणे २.अरबाज ऊर्फ मलंग ऊर्फ तुंडया शब्बीर कुरेंशी,वय-२०,रा.सदर ३.सनि विजय अँडी,वय-२६,रा.आनंद पार्क धानोरी,विश्रांतवाडी,पुणे (अटक) व इतर पाच इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी २०/२५ वा.मुळा रोड शेजारील जंगला मध्ये खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे इत्यादी घातक शस्त्रे तसेच मोबाईल फोन,सुमो गाडी असा एकुण ४,०९१७०/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,जवळील कोणत्यातरी सराफ दुकान किंवा अन्य कोठेतरी दरोडा टाकण्याच्या तयारीच्या उद्देशाने नियोजनबध्द शस्त्रासह आलेबाबत फिर्यादी यांना बातमी मिळाल्याने फिर्यादी व त्यांचे सहकारी हे त्यांना ताब्यात घेत असताना,सदर इसमांनी पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असताना,स्टाफ मधील पो.शि.शिंदे व पो.शि.गाडे हे किरकोळ जखमी झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महाडीक ९७६६६८८३२७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १६०/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | दत्तात्रय बराटे,वय-३९ वर्षे,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा. ते १३/३० वा. चे दरम्यान नानाश्री बिल्डींग, वारजे गावठाण चावडी समोर,पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील २,८२,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ६,४४,५००/- रु किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.धावडे ९९२२२६१४६९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १७३/१८,भादविक ३५३,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | महेन्द्र वत्रे,पो.शि. स्वारगेट वाहतुक विभाग पुणे शहर |
| **आरोपी** | अजीज रमजान तांबोळी,वय-३२ वर्षे,रा.नाना पेठ,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी २०/३० वा. ढोले पाटील चौक,शंकरशेठ रोड,खडक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वाहतुक विभागातर्फे ड्रंक ॲण्ड ड्राइव्हचे केसेस करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,मोटार सायकलवर पाठीमागे बसलेल्या यातील नमुद इसम अजीज तांबोळी याने फिर्यादी हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून त्यांना धक्का-बुक्की करून अपशब्द वापरले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.टेरे ९५५२५५२४१८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४४१/१८,भादविक १४३,१४७,१४८,४२७,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो. ॲक्ट ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | आशिष उबाळे,वय-२५ वर्ष,रा.काळाखडक वसाहत,वाकड,पुणे |
| **आरोपी** | एकुण सहा इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०५/२०१८ रोजी २१/३० वा.भुमकर चौक ते डांगे चौक रोडचे कडेला काळाखडक वसाहत,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेवण करून शतपावली करण्यासाठी नमुद ठिकाणी आले असताना,संजय पवार याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून,त्याचे मित्रांहस बेकायदेशीररित्या एकत्र जमुन हातात दगड,कोयता व तलवार घेऊन येवुन,फिर्यादीचा पाठलाग करून त्यांची कार व त्यांचे मित्र असिम भालेराव याचे मोटार सायकलवर दगडाने व कोयत्याने मारून दोन्ही वाहनांचे नुकसान करून,फिर्यादी व त्यांचे घरातील लोकांना जीवे मारण्याची धमकी देऊन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.बाबर ९०२८५७५५९६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३३०/१८,भादविक ४६५,४६८,४७१,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३९ वर्ष,कल्याणीनगर,पुणे |
| **आरोपी** | १.प्रणव विजय चौधरी,वय-२१ वर्ष,रा.सावित्री अपार्टमेंट,सोमवार पेठ,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०३/२०१८ रोजी किंवा त्यापुर्वी बिशप्स कोएड स्कुल,कल्याणीनगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे बिशप्स कोएड या शाळे मध्ये एक विद्यार्थी याचे इयत्ता- तिसरीचे वर्गा साठी व दुसरा विद्यार्थी याचे ज्युनिअर के.जी.चे प्रवेशासाठी,सदर विद्यार्थ्यांचे पालक यांनी यातील नमुद इसम प्रणव चौधरी यांचे संगनमत करून,नमुद कालावधी मध्ये अध्यक्ष,मिनिस्टर स्टेटस हायकोर्ट पॉवर ज्युरिसडिक्शन मेंबर ऑफ डिफेंन्स ॲण्ड हायर प्लॅनिंग कमिटी गव्हरमेंट ऑफ इंडीया,न्यु दिल्ली यांचे नावाचे राजजुद्रा असलेले लेटरहेड तसेच जॉईन्ट सेक्रेटरी,प्रधानमंत्री कार्यालय,न्यु दिल्ली यांचे नावाचे राजमुद्रा असलेले लेटरहेड असे दोन्ही बनावट लेटरहेड तयार करून ते खरे असल्याचे भासवुन ते फिर्यादी यांचे बिशप्स कोएड शाळेत प्रवेश करण्याचे शिफारसीसाठी सादर करून,फिर्यादी यांचे शाळेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गवारी ९९२३५०९८९२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २१७/१८,भादविक ४१७,४६५,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | ॲलन अलमेडीया,वय-५३ वर्षे,रा.सॅलीसबेरी पार्क,पुणे |
| **आरोपी** | स्पायसर ॲडव्हेंटीस्ट युनिर्व्हसीटी,औंध रोड,पुणे या संस्थेतील- १.व्हाईस चॅन्सलर २.चिफ फायनान्सीएल ऑफीसर ३.हेड ऑफ द डिपार्टमेंट आर्टस ४.संचालक,क्रिएटीव्ह एडयुकेशनल फाउंडेशन (हिंदुस्थान कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँण्ड रिसर्च),कात्रज चौक,पुणे ५.सदरचे बनावट डीग्री बनविण्यासाठी सहकार्य करणारे इतर संबंधीत इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१० ते २०१३ रोजीचे कालावधीत स्पायसर ॲडव्हेंटीस्ट युनिर्व्हसीटी,औंध रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद स्पायसर ॲडव्हेंटीस्ट युनिवर्सीटी,औंध रोड,पुणे या संस्थेतील- १.व्हाईस चॅन्सलर २.चिफ फायनान्सीएल ऑफीसर ३.हेड ऑफ द डिपार्टमेंट आर्टस ४.संचालक, क्रिएटीव्ह एडयुकेशनल फाउंडेशन (हिंदुस्थान कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँण्ड रिसर्च),कात्रज चौक,पुणे ५.सदरचे बनावट डीग्री बनविण्यासाठी सहकार्य करणारे इतर संबंधीत इसम यांनी सन २०१० ते २०१३ चे कालावधी मध्ये आपसात संगनमत करून फसवणुक करण्याचे उद्देशाने बनावट पीएचडी डीग्री प्राप्त करून,ती डिग्री खोटी आहे हे माहीती असतानादेखील ती वापरात आणुन,त्या बनावट डीग्रीचे आधारे स्पायसर ॲडव्हेंटीस्ट युनिर्व्हसीटी,औंध रोड,पुणे येथे प्रमोशन व अर्थिक फायदे घेवुन संस्थेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डि.के.कापरे, गुन्हे शाखा युनिट-१ पुणे शहर ९१४६४६११६० |

## दि.१७/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १२९/१८,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | धना अरूण जानराव,वय-३१ वर्षे,रा.ओटा बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी २२/३० वा. ए,३९/२३,२७६, ओटा बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ बापु यास यातील नमुद इसम अजय घोडके व त्याचा मित्र याने बापु यास दुचाकी जोरात चालविण्याचे कारणावरून त्यास शिवीगाळ करीत असताना,फिर्यादी हे सदर ठिकाणी जावुन त्यांना समजावुन सांगत असताना,त्यांनी फिर्यादी यांचे अंगावर जावुन त्यांना शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,धारधार शस्त्राने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यावर व हातावर वार करून गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.जे.आर.जाधव ९७३०५१८४८३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**